Deshpande-Shendkar
REALTY LLP

101, 102 & 201, "Dhutpapeshwar",
Plot No. 2 , Mrityunjay Co. Op. Hsg. Soc.,
Mayur Colony, near Aviraj Hostel,
Kothrud, Pune 411038.
Email : **deshpanderealty1@gmail.com**
Website : **www.DeshpandeRealty.com**

दिनांक: १०/१०/२०२६

प्रति,
मा. अध्यक्ष व कार्यकारी समिती,
अर्चना नगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
३९/२/२, एरंडवणे, पुणे - ४११०३८.

विषय: पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती व पुढील कार्यवाहीबाबत.
संदर्भ: आपले पत्र क्र. ४२/२०२६-२०२७, दिनांक २८/०९/२०२६.

महोदय,

आपले संदर्भीय पत्र प्राप्त झाले. आपल्या संस्थेचा पुनर्विकास प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा, यासाठी आमची संपूर्ण टीम पूर्ण लक्ष देऊन युद्धपातळीवर काम करत आहे. प्रकल्पाशी संबंधित कामांचा नियमित आढावा घेऊन आवश्यक पाठपुरावा सातत्याने सुरू आहे.

आपल्या प्रकल्पाचे सर्व प्लॅन्स व लेआउटचे अंतिमीकरण करण्यात आले असून, पुढील कार्यवाहीसाठी आराखडे तयार आहेत. सध्या संस्थेच्या मालकीहक्काच्या स्पष्टतेसाठी आवश्यक न्यायालयीन आदेशाची प्रतीक्षा आहे. त्यासंबंधी आवश्यक औपचारिकता पूर्ण करण्यात आल्या असून, सदर आदेश लवकरात लवकर प्राप्त होईल, अशी अपेक्षा आहे.

आदेश प्राप्त होताच मानीव अभिहस्तांतरणाची (डीम्ड कन्व्हेयन्स) प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर मालमत्ता पत्रकावर (प्रॉपर्टी कार्डवर) संस्थेचे नाव व संबंधित क्षेत्रफळाची नोंद करून घेणे, तसेच पूर्वीच्या मोजणी व हद्दनिश्चितीच्या नोंदींमध्ये आवश्यक दुरुस्त्या करूनन विकास कराराच्या प्रक्रिया पुढे नेण्यात येईल.

संस्थेचे मालकीहक्क स्पष्ट झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेकडील आराखडा मंजुरी, आयओडी व लागू असलेली पर्यावरणीय मंजुरी (ईसी), तसेच इतर आवश्यक परवानग्यांची कार्यवाही नियमानुसार पूर्ण करू. प्रत्येक टप्पा शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यासाठी आमचे नियोजन व प्रयत्न सुरू आहेत.

यापुढे कामाच्या प्रगतीचा अहवाल संस्थेला दर दोन महिन्यांनी नियमितपणे देण्यात येईल. त्यामध्ये पूर्ण झालेली कामे, प्रलंबित बाबी आणि पुढील कालावधीतील नियोजित कार्यवाहीची माहिती कळविण्यात येईल. महत्त्वाचे आदेश किंवा मंजुरी प्राप्त झाल्यास त्याची माहितीही त्वरित देण्यात येईल.

DESHPANDE SHENDKAR REALTY LLP ★ PUNE ★

GLOBAL REALTY ★ Shendkar Projects ★

विकासक म्हणून प्रकल्प पूर्ण करण्याची आमची तयारी, क्षमता व बांधिलकी कायम आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने दर्जेदार पुनर्विकास पूर्ण करून सभासदांना सुंदर, सुरक्षित व सुयोग्य नवीन घरे लवकरात लवकर सुपूर्द करणे, हेच आमचे उद्दिष्ट आहे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

प्रणव शेंडकर

अधिकृत प्रतिनिधी

Deshpande Shendkar Realty LLP

DESHPANDE SHENDKAR REALTY LLP ★ PUNE

GLOBAL REALTY ★ Shendkar Projects ★